# ।। श्री निवृत्तिनाथ महाराज आरती ।।

जय देवा जय देवा निवृत्ति सूर्या ।

भावे ओवाळीतो तुजसी गुरुवर्या ।।ध्रु.।।

गयनी कृपास्पर्शे तळपसी यतिवर्या ।

अज्ञानतिमिरांधी प्रकाश अर्पाया ।।१।।

शिवअवतार परी मूर्त शांति तू सदया ।

स्वरूपस्थित साक्षी तू चिरंजीव जगी या ।।२।।

श्रांता भ्रांता जीवा त्वरिता उद्धराया ।

आज्ञापी ज्ञानेशा दीपिका तेवाया ।।३।।

कृपास्पर्शे माया जाई गे विलया ।

कूर्मदृष्टी पोशिसी निजभक्तां सखया ।।४।।

शरणांगत तव पदी ही साष्टांग काया ।

कृष्णदास हृदयस्था प्रार्थी, नित कृपाछाया ।।५।।

* * *

-- कृष्णदास (सुदेश चोगले)

पौष कृष्ण एकादशी शके १९३६ - श्री निवृत्तिनाथ यात्रा, त्र्यंबकेश्वर - १६ जानेवारी २०१५